वितरण आदेश

आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत
"प्रशासकीय खर्चाकरीता" अनुदान
वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः आआग्रा-२६१९/प्र.क्र-१३/योजना-५
बांधकाम भवन, तळमजला
२५,मर्झबान पथ, फोर्ट,मुंबई-४०० ००१.
तारीख: २२ मार्च,२०१९.

वाचा -

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५
२) ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र.आआग्रायो-२०१५/प्र.क्र.३६/योजना-५ दिनांक: २० मे,२०१५.
३) ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र.आआग्रायो-२०१५/प्र.क्र.८०/योजना-५ दिनांक: ०८ ऑक्टोबर, २०१५.
४) ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र.आआग्रायो-२६१७/प्र.क्र.११८/योजना-५, दिनांक: १४ मार्च, २०१८.
५) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल,२०१८.

प्रस्तावना -

केंद्र शासनाच्या सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना दिनांक २० मे,२०१५ च्या शासन निर्णयान्वये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आमदार आदर्श ग्राम योजनेतर्गत प्रशासकीय खर्च भागविण्याकरीता **मागणी क्र.एल-३, २५०१,ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ००१ संचालन व प्रशासन, (००)(०५) आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चासाठी**

अनुदान, (२५०१ अे ००१) या लेखाशिर्षाखाली २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी रुपये ५ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित केला आहे.

शासन निर्णय§

१. २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्रशासकीय खर्च या करीता येणारा खर्च भागविण्याकरी **मागणी क्र.एल-३, २५०१,ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ००१ संचालन व प्रशासन, (००)(०५) आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चाकरीता अनुदान ,** (२५०१ अे ००१) या लेखाशिर्षाखाली रुपये ५,००,००,०००/- (रुपये पाच कोटी फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पित केला आहे.

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०२ एप्रिल, २०१८ मधील तपासणी सूचीनुसार अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याने आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चाकरीता सन २०१८-१९ वर्षाकरीता अर्थसंकल्पित केलेला निधी रुपये ५,००,००,०००/- (रुपये पाच कोटी फक्त) च्या ८०% च्या मर्यादेत **रुपये ४,००,००,०००/-(रुपये चार कोटी फक्त)** इतके अनुदान वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तथा राज्य समन्वय अधिकारी, सांसद आदर्श ग्राम योजना व आमदार आदर्श ग्राम योजना यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सुपूर्द करण्यात येत आहेत.

सदरचा खर्च ग्राम विकास विभाग मागणी मागणी क्र .एल-३, २५०१, ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ००१ संचालन व प्रशासन, (००) (०५) आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत प्रशासकीय खर्च याकरीता येणाऱ्या खर्चासाठी अनुदान, (२५०१ अे ००१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ च्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. हे अनुदान ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजना -करीता खर्च करण्यात यावे, अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. वित्त विभाग परिपत्रक, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर निधी खर्च न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

४. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान मुख्य कार्यकारी अधिकारी , महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तथा राज्य समन्वय अधिकारी, सांसद आदर्श ग्राम योजना व

आमदार आदर्श ग्राम योजना यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे (B.D.S.) वितरीत करण्यात येत आहे.

५.सदरहु अनुदान कोषागारातून काढल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तथा राज्य समन्वय अधिकारी ,सांसद आदर्श ग्राम योजना व आमदार आदर्श ग्राम योजना यांनी खाली नमूद केलेली माहिती त्वरित लेखाधिकारी, योजना-२, बांधकाम भवन, २५-मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१ यांच्याकडे पाठविण्यात यावी.

१.मंजुर केलेली रक्कम,
२.कोषागारातून काढलेली रक्कम,
३.रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक
४.सदर निधी खर्च झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र
५.महालेखापाल कार्यालयातील रकमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.
६.वितरित केलेल्या निधीबाबत सविस्तर तपशील

६. हा शासन निर्णय प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग , शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागांना वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांनुसार व वित्त विभागाच्या परिपत्रक दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना त्यांचे स्तरावर वितरीत करण्याचा प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१६४९४६७७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2019.03.22 15:10:41 +05'30'

अनिल काळे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई.

२) मा.राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४) महालेखापाल (लेखापरिक्षा) व (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.

५) महालेखापाल (लेखापरिक्षा) व (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२,नागपूर.

६) संचालक, लेखा व कोषागार, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) संचालक, निवासी व लेखा कोषागार, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व)

९) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व)

१०)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तथा राज्य समन्वयक, सांसद आदर्श ग्राम योजना व आमदार आदर्श ग्राम योजना , सिडको भवन, ५ वा मजला, दक्षिण विभाग, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

१२)उप आयुक्त, (विकास) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).

१३)प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व).

१४) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).

१५)मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

१६) उपसचिव, वित्त विभाग (व्यय-१५/अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.

१७) संचालक, अर्थ व सांख्यिकी, महाराष्ट्र राज्य मुंबई.

१८) वरिष्ठ लेखाधिकारी, शासनस्तर अंतर्गत लेखा परिक्षण पथक, बांधकाम भवन,मुंबई-०१

१९) कक्ष अधिकारी, (योजना-१/२/३/६/१०), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-००१.

२०)कक्ष अधिकारी, (वित्त-१/२/३/४/५/६/७/८/९) ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-००१.

२१)निवडनस्ती (योजना-५).